**नि.क्र.१४२**

नि.दि.दावा नं. १३४/२०१२
वासंती राणे
वि.
मालती गोसावी

**वादीतर्फे साक्षीदार क्र. ०३**

मी देवा शपथ खरे सांगतो की:

माझे नावः नामदेव शंकर पाढरे

वयः ६४ वर्षे, व्यवसायः शेती,

राहणार – वणी, ता. रोहा, जि. रायगड.

**सरतपास वादीतर्फे विधिज्ञ श्रीमती एम. एम. पाटील यांचेमार्फत सुरू.**

०१. मी न्यायालयीन समन्स प्राप्त झाल्यामुळे साक्ष देण्यासाठी हजर झालो आहे. मी वणी ग्रामपंचायत मध्ये सन १९९४ ते २००३ पर्यंत ८ वर्षे सरपंच होतो. वणी गावात साधारण १००० लोकसंख्या असुन २०० ते २२५ घरे आहेत. मी वणी गावातील स्थानिक रहिवासी आहे. मी सरपंच असल्यामुळे मला गावातील घरांची व लोकांची माहिती आहे. वणी गावात मारुती हिरु वनकर व रामचंद्र हिरु वनकर हे दोघे सख्खे भाऊ रहात होते. ते दोघे आज रोजी हयात नाही. ते रहात होते त्या ठिकाणी त्यांची मुले राहतात. रामचंद्र यांना तीन मुले आहेत व मारुती यांना तीन मुली आहेत. मारुतीच्या तिन्ही मुलींना मी ओळखतो. आज रोजी मारुतीची एक मुलगी मुक्ताबाई उर्फ वासंती न्यायकक्षात हजर आहे. ती आजही लग्न झाल्यापासुन वणी गावात रहाते. तिच्या पतीचे नाव गजानन राणे आहे. तिचा पती मयत आहे. मारुतीच्या तिन्ही मुली विवाहीत आहेत, इतर दोन मुलींचे सासर धानकान्हे, ता.रोहा आहे, परंतु सध्या त्या दोघी नेमक्या कोठे राहतात ते मला माहित नाही. गजानन राणे हा मुळ दासगाव, ता. महाड येथील राहणारा होता. वासंती ही वणी गावात रहाते व तिचे स्वतःचे घर आहे. ती ४० वर्षांपासुन वणी गावात रहाते. वासंतीचे वडील मारुती व चुलते रामचंद्र यांचा शेती व्यवसाय

होता. मारुती हयातीत शेती करायचा, त्यानंतर मालती जास्त शेती बघायला लागली, परंतु त्या तिघी बहीणीत भांडणे झाली. मालतीच शेती बघत होती. वणीपासुन धानकान्हे गाव १५ ते २० कि.मी. अंतरावर आहे. मालती आता कुठे राहते ते मला माहित नाही. ती वणीमध्ये रहात नाही. एखादयाला मुलगा नसेल व मुलीच असतील तर तो एखादया मुलीचा आधार घ्यायचा. ज्या मुलीचा आईवडीलांनी आधार घेतला असेल सामान्यतः त्या मुलीने आईवडीलांकडे रहाणे अपेक्षित आहे. मारुती केव्हा मयत झाले ते मला सांगता येणार नाही.

०२. मारुती व रामचंद्र हयात असताना ते एकाच घरातील दोन वेगवेगळया भागात रहात होते व ते दोघे स्वतंत्र घरपट्टी भरायचे, परंतु ते घर त्यांच्या वडीलांचे होते. त्या घरातील एका भागात आज रोजी रामचंद्रचा मुलगा संदेश रहातो आणि मारुती रहात असलेला दुसरा भाग सध्या असाच पडुन आहे. मारुती वय जास्त झाल्यामुळे मयत झाले.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे विधिज्ञ श्री. आर. बी. सावंत यांच्यातर्फे शपथेवर सुरु.**

०३. हे म्हणणे खरे आहे की वणी गावातील कर्ते सवर्ते मुले गावाबाहेर व लग्न झालेल्या मुली त्यांच्या सासरी रहात आहेत. हे म्हणणे खरे आहे की ती मुले व मुली गावात समारंभाकरीता तसेच आईवडीलांना बघण्यासाठी येत आहेत. हे म्हणणे खरे आहे की मारुती व रामचंद्र यांचे वडील हिरु यांना मी स्वतः पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की मारुती फार शिकला नसला तरी जाणकार माणुस होता. हे म्हणणे खरे आहे की मारुती व रामचंद्र यांची माझ्या अगोदरची पिढी चांगल्या व काटक अंगकाठीची होती.

०४. हे म्हणणे खरे आहे की गावात मृत्युकार्य रिती रिवाजाप्रमाणे केले जाते. हे मला माहित नाही की मारुतीला मुलगा नसल्यामुळे त्याचे मृत्युकार्य मालतीनेच केले होते. हे म्हणणे खरे आहे की वासंतीचा पती गजानन याचे वणीमध्ये स्वतः बांधलेले स्वतंत्र घर आहे. हे मला

माहित नाही की मारुतीचा मृत्यु होण्यापुर्वी गावात डॉक्टरांची सोय नसल्यामुळे त्यांना उपचाराकरीता जिथे डॉक्टर असेल तेथे परगावी नेले होते. हे म्हणणे खरे आहे की मारुतीची पत्नी त्याच्यापुर्वी मयत झाली होती. हे म्हणणे खरे आहे की आई अगोदर मयत झाल्यामुळे वडील मारुती एकटे पडले होते व त्यामुळे मालती अधुममधुन येवुन जावुन त्यांची देखभाल करायची.

०५. हे म्हणणे खरे आहे की मारुती व रामचंद्र यांनी त्यांची घरे स्वतःच्या हिंमतीवर स्वतंत्रपणे बांधली. आमच्या गावात घरपट्टी व पाणीपट्टी भरली जाते व विजेची सोय देखील आहे. हे मला माहित नाही की मारुतीच्या घराची घरपट्टी मालती भरायची.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2026.07.27 16:19:17 +0530

स्थळ : रोहा. (एस. व्ही. खैरे)

दि. २७.०७.२०२६ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), रोहा.